ॐ श्री गणेशाय नम: ।

ॐ वक्रतुंड महाकाय सूर्यकोटीसमप्रभ ।
निर्विघ्नं कुरू मे देव सर्वकार्येषु सर्वदा ॥

ॐ गँ गणपतये नमः।

# आरती श्री मंगलमूर्तीची

आरती श्री गणरायाची
मोरया मंगलमूर्तीची ॥धृ.॥

गजमुख तुंदिलतनु मोहक
वाहूनी नेई सान मूषक
पाहूनी करी गौरी कौतुक
थोर लीला शिवतनयाची
मोरया मंगलमूर्तीची ॥१॥

जन सामान्य मुनी ज्ञानी
पूजिती तुला वनी सदनी
कार्य निर्विघ्न व्हावे म्हणूनी
मागती कृपा गणेशाची
मोरया मंगलमूर्तीची ॥२॥

कोटी सूर्यासम तव तेज
जाळी अज्ञान क्षणी सहज
प्रसन्न जव होई गणराज
मिळे झणी वाटही मुक्तीची
मोरया मंगलमूर्तीची ॥३॥

- नारायण
१०/२७/९६ (अमेरिका)

मंगलमूर्ती मोरया ।
गणपतीबाप्पा मोरया ||